आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १५३ वा ● शुक्रवार दि. १५ नोव्हेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## निलंगा मतदारसंघातील गृह मतदान प्रक्रियेची निवडणूक निरीक्षकांनी केली पाहणी

लातूर: निलंगा विधानसभा मतदारसंघात आजपासून गृह मतदान (होम वोटिंग) प्रक्रिया सुरु झाली. सामान्य निवडणूक निरीक्षक लक्ष्मीकांत प्यारेलाल प्रधान यांनी प्रत्यक्ष भेट देवून या प्रक्रियेची पाहणी केली. तसेच आयटीआय येथील सुरक्षा कक्षाला भेट दिली.निलंगा येथील



महाराष्ट्र महाविद्यालयात मतदार संघनिहाय मतदार सुविधा कक्ष तयार करण्यात आले होते. तसेच माहिती कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र सुविधा कक्ष तयार करण्यात आले होते. याठिकाणी मतदान कर्तव्यावरील पोलीस कर्मचारी, मतदान पथकातील कर्मचारी, होमगार्ड व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## झरोका

एक – मान्य करा किंवा करु नका, भार–ताची अर्थ व्यवस्था डबघाईत आली आहे. बे रोजगारीत महागाईची भर पडली आहे, तरी ही भारत महासत्ता बनणारच आणि भारताची अर्थ व्यवस्था बळकट बनली आहे. असा कांगावा केंद्र सरकार करीत असल्यामूळे हे काय गौडबंगाल आहे हेच कळत नाही. डोक बधीर झाल आहे.

दुसरा – अरे, केंद्र सरकारच्या नावाने बोटे मोडू नकोस, प्रधान मंत्री नरेंद्र मोदी अन् अमित शहा हे तूझ्या मागे लागले तर, ईडीतून तूझी सूटका होणार नाही. मग अर्थ व्यवस्था, बेरोजगारी, महागाई बद्दल कशासाठी बडबडतो आहेस.

एक – अहो, सर्वसामान्य जनता बेरोजगारीच्या खाईत आहे. हाताला काम नाही, खाण्यासाठी धान्य नाही, फुकटातलं कुजकं धान्य देवून रोगराईच्या विळख्यात गोरगरीबांना ढकलले जाते आहे, मग अशा सरकारला चाटायचे आहे काय, म्हणून बोल–तोय, मला कसली भिती नाही.

दुसरा – अरे, भितीवाल्या, सत्तेपुढे तुझे शाहनपन चालत नाही. भल्याभल्यांना जेरबंद करुन भ्रष्टाचाराला शिष्टाचार ठरवून सत्ताकारण करण्यात मोदी, शहा गुंतले आहेत, आणि तू बेरोजगारी, महागाई बद्दल बोलतो आहेस, तूझी घेरली आहे काय.

एक – अहो, मला अशा धमक्या देवू नका. मला घर ना दार, मला भिती कोणाची मग ईडी काय अन् सीबीआय काय, याची मला भिती नाही. त्यामूळे एकना एक दिवस अशा मुजोर सत्ताधाऱ्यांना धडा शिकविल्या शिवाय माझ्यासारखे शांत बसणार नाही. हे लक्षात ठेवा.

दुसरा – अरे, भरकटल्यासारखे बडबड करु नकोस, मगाच मी तूला सत्ते पुढे शहाणपण चालत नाही असे म्हटलो, ते विसरलास काय, हे लक्षात ठेव कारण खऱ्याचे खोटे करणे आणि खोट्याचे खरे करणे, यालाच सत्ताकारण म्हण–तात, हे लक्षात ठेव.

एक – अहो, तूमचा शहाणपणा कांही कामाचा नाही. कारण गेल्या दहा वर्षापासून प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे कॉंग्रेस मुक्त भारताची भाषा करतात. परंतू कॉंग्रेस मुक्त भारत होण्या ऐवजी कॉंग्रेस युक्त भाजपा अशीच अवस्था बनली आहे. कारण कॉंग्रेसवाले, भाजपा बद्दल बोलत नाही,मोदीवर टिका करतात, परंतू प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे दिवसातून हजार वेळा दररोज कॉंग्रेस, कॉंग्रेसच बडबडतात, त्यामूळे कॉंग्रेस युक्त भाजपा असेच म्हणावे लागेल. त्यामूळे महागाई, बेरोजगारी बद्दल एक शब्द ही न बोलणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काय कामाचे मग काय.

दुसरा – अरे, शासन, प्रशासन, पो–लीस यंत्रणा, कायदा सुव्यवस्था या सर्व बाबी सत्ताधाऱ्यांच्या हाती असतात. त्यामूळे तुझ्या माझ्या सारख्या विरोधकाचे कांही चालत नाही, म्हणून बोलतो आहे. हे लक्षात ठेव.

एक – अहो, तूमचे तत्वज्ञान तुमच्या जवळच ठेवा, मला कोणाची भिती नाही, मी बेरोजगारी महागाईवर बोलणारच तुमच्यासह प्रधान मंत्री मोदी आणि शहा यांनी ही भान ठेवून कार्यरत राहावे एवढेच माझे म्हणने आहे.

# वंचितचे उमेदवार विनोद खटके यांच्या महापरिवर्तन पदयात्रेला उदंड प्रतिसाद

लातूर :लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके यांच्या प्रचारार्थ १४ नोव्हेंबर रोजी दुपारी काढण्यात आलेल्या महपरिवर्तन यात्रेला मोठा प्रतिसाद मिळाला. हजारोच्या संख्येने नागरिकांचा या महपरिवर्तन यात्रेत सहभाग होता. उमेदवार विनोद खटके यांचा प्रचाराचा झंजावात सुरु आहे. लातूर शहरातील सर्व प्रभागातून त्यांना पाठिंबा वाढत आहे.



राजर्षी शाहू महाराज चौकात राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून वंचित बहुजन आघाडीच्या महापरिवर्तन पदयात्रेला प्रभाग क्रमांक ३ मध्ये उत्साहात सुरुवात झाली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष सलीमभाई सय्यद यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.राजर्षी शाहू महाराज चौक, मेघराज नगर, मिलिंद शाळा परिसर, तथागत चौक, आनंद नगर येथील बुद्ध विहार मार्गे, लालगोडाऊन माघील पूर्ण परिसर, दसरा पार्क जवळील परिसर, इंदिरा नगर मार्गे राजीव नगरमध्ये या महापरिवर्तन पद यात्रेचा समारोप झाला. नागरिकांचा या पदयात्रेला यात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, त्यांनी परिवर्तनाच्या हाकेला ऊर्जेत सामील होऊन समर्थन दिले.

विशेषतः लहान मुलांनी महिलांनी वृद्धाची उपस्थिती या पदयात्रेत मोठ्या संख्येने होती. उमेदवार विनोद खटके यांनी या पदयात्रे दरम्यान मतदारांच्या भेटी घेतल्या. येत्या २० तारखेला परिवर्तनासाठी वंचितच्या गॅस सिलिंडर च्या चिन्हाचे बटन दाबण्याचे आवाहन केले. बुजुर्ग मतदारांच्या पाया पडून त्यांचे आशीर्वाद घेतले. लातूर शहराच्या आणि माणसांच्या भविष्य घडवणारी ही गर्दी होती...

ही पदयात्रा फक्त जनतेची उत्सुकता नव्हे, तर सत्ताधाऱ्यांच्या निष्क्रिय धोरणांवर जनतेचा प्रतिकार ठरली. वंचित बहुजन आघाडीच्या नेत्यांनी यावेळी आवाज उठवत सर्वसामान्यांचे हक्क आणि त्यांच्या समस्यांवर ठोस उपाययोजना करण्याचे आश्र्वासन दिले. सर्व समाजातील कुटुंबे, तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊनच परिवर्तनाची उर्मी दाखवली, ज्यामुळे परिसरात नव्या राजकीय बदलाची चाहूल लागली आणि एकतेचा संदेश पसरला. या पदयात्रेतील गर्दी उल्लेखनीय होती.

# जनसंपर्क अभियाना अंतर्गत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या २४०० कोटीच्या विकासकामांची दिली माहीती लातूरकरांचा उस्फुर्त प्रतिसाद

लातूर (प्रतिनीधी) : कॉंग्रेस–महाविकास आघाडीचे लातूर शहर मतदारसंघातील उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी यांनी प्रभाग क्रमांक १४ मध्ये प्रचारफेरी काढून घरोघरी भेट देऊन उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी दोन्ही प्रभाग अध्यक्ष, सर्व बूथ प्रमुख प्रमुख पदाधिकारी व पक्षावर प्रेम करणारे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विधानसभा निवडणुक २०२४ प्रचार अनुषंगाने कॉंग्रेस पक्ष नेतृत्वाच्या मार्गदर्शनाने महाविकास आघाडीच्या लातूर शहर मतदार संघात पदयात्राए गृहभेट व कॉर्नर बैठकाचे आयोजन करण्यात आले. ड किरणजी जाधव अध्यक्ष लातुर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी यांच्या मार्गदर्शनात प्रभाग क्र ५ श्रीकृष्ण नगर येथे कॉर्नर बैठक घेण्यात आली. बैठकीस लातुर शहर महानगर पालिकेच्या पहिल्या महापौर श्रीमती स्मिताताई खानापुरे तसेच महाविकास आघाडीचे नेते सोमनाथ झुंजारे, ड बालाजी कुटवाडे, प्रभाग निरीक्षक नामदेवरावजी इगे, प्रभाग समन्वयक रवीकुमार जाधव (मा.बांधकाम सभापती), प्रभाग अध्यक्ष खाजामियां शेख, सोमनाथ तोटाळे, हब्बुभाई चाऊस, विश्र्वनाथजी ढगे, कांबळे, अस्लमभाई शेख, श्यमाम काळे, अश्पाकजी चौधरी, गंगाधरजी शिंदे, संजय क्षीरसागर, उमेशजी टाडोळे यावेळी कॉंग्रेसचा विचार हा सर्वसामान्यांच्या विकासाचा विचार आहे. त्यामुळे या विचारासोबत अनेकजण





जोडली जात आहेत. यामुळे कॉंग्रेस पक्षाची ताकद वाढते आहे. या ताकदीच्या जोरावर राज्यात कॉंग्रेस व महाविकास आघाडीचे सरकार आणूया. सर्वांना सोबत घेऊन नव्या उमेदीने आणि दृढ विश्र्वासाने कामाला लागू, असे यावेळी आश्र्वस्त केले प्रभाग १८ मधील नागरिकांच्या भेट घेऊन विकास कामांची दिली माहीती प्रभाग १८ मधील शंकर पुरम नगर परिसरातील नागरिकांच्या भेट घेऊन प्रभाग १८ मधील विकास कामांची माहीती देऊन मतदारांना विनंती केली की अमित विलासराव देशमुख यांना प्रचंड मतांनी विजयी करावे. यावेळी कॉंग्रेस पक्षाचे बाळाप्रसाद बिदादा, सुरेश गुंडरे, गोमारे,अमोल गायकवाड, शोएब शेख, राजाराम कोंगे, चंद्रशेखर पाटील, आकाश कदम, अलीम शेख, माऊली मुदामे तसेच बूथ प्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

प्रभाग १६ मधील नागरिकांच्या भेट घेऊन विकास कामांचे प्रभाग क्रमांक १६ मोरे नगर लातूर येथे बैठक घेऊन लक्ष्मण कांबळे, बालाप्रसाद बिदादा लक्ष्मीनारायण नावंदर, गोविंद सुरवसे यांनी या भागातील महिला व पुरुष मतदारांची भेट घेऊन कॉंग्रेस पक्षाला मतदान करण्याचे आवाहन केले.

यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्रमांक १४ मध्ये काढली पदयात्रा कॉंग्रेस–महाविकास आघाडीचे लातूर शहर मतदारसंघातील उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी यांनी प्रभाग क्रमांक १४ मध्ये प्रचारफेरी काढून घरोघरी भेट देऊन उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी दोन्ही प्रभाग अध्यक्ष, सर्व बूथ प्रमुख प्रमुख पदाधिकारी व पक्षावर प्रेम करणारे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होतेमाजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यासाठी प्रभाग क्रमांक १० मध्ये धूमधडाक्यात प्रचार

कॉंग्रेस–महाविकास आघाडीचे लातूर शहर मतदारसंघातील उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्रमांक १० मध्ये प्रचारफेरी रामजी नगर येथून काढण्यात आली. या प्रचार फेरीच्या माध्यमातून समद पटेल, कातळे, अतीश चिकटे माजी महापैर ड. दिपकजी सुळ, बालाजी मुस्कावाड यांनी घरोघरी भेट देऊन उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी दोन्ही प्रभाग अध्यक्ष, सर्व बूथ प्रमुख प्रमुख पदाधिकारी व पक्षावर प्रेम करणारे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

महाविकास आघाडीचे लोकप्रिय उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारासाठी प्रभाग क्रमांक २ दोन मध्ये महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यां सोबत डोअर टू डोअर कॅम्पेनिंग करण्यात आली. यावेळेस महाविकास आघाडीचे लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष किरणजी जाधव, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार) कोकने ताई, मोईन शेख, शिवसेना (उद्धव ठाकरे) प्रदीप बनसोडे,मिथुन बनसोडे, कॉंग्रेसचे सचिन बंडापल्ले, भाऊसाहेब बडीकर, शैलेश ईनवाड, राज क्षीरसागर, लातूर शहर जिल्हा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष इम्रान सय्यद,शेख अलीम सर, कासिम भाई, अनस मौलाना, नजीर भाई, सत्यवान कांबळे, सुशील गायकवाड, कलीम भाई, सादिक भाई, शादुलभाई, सादिक भाई, सय्यद भाई, गौस भाई, सुमित जी, राम कलमेजी, बळी भाऊ, बबन जी गायकवाड व प्रभागातील प्रतिष्ठित नागरिक आंधळे मामा, केंद्रे बाबा, अंकुश पांचाळ, दशवंते सर, सळुंके उपस्थित होते.

## स्वराज्य पक्षाचे उमेदवार सतीश करंडे यांच्या प्रचारार्थ युवराज छत्रपती शहाजीराजे यांची आज गंजगोलाईतून भव्य रॅली

लातूर – लातूर शहर विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सध्या मोठ्या प्रमाणात सुरू असून लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून परिवर्तन महाशक्ती आणि महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने सतीश राजेंद्र करंडे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून त्यांच्या प्रचारार्थ आज शुक्रवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी युवराज छत्रपती शहाजी राजे हे लातूर दौऱ्यावर येत असून स्वराज्य पक्षाचे उमेदवार सतीश करंडे यांच्या प्रचारार्थ गंजगोलाई येथील आई जगदंबेची आरती करून भव्य रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीस मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वराज्य पक्षाचे सतीश करंडे यांनी केले आहे.



लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून परिवर्तन महाशक्ती आणि महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने सतीश राजेंद्र करंडे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी सकाळी ११:३० वाजता सोलापूर येथून लातूरकडे रवाना होणार आहेत, युवराज छत्रपती शहाजीराजे यांचे दुपारी २ वाजता लातूर शहरात आगमन होणार आहे दुपारी २ .२० वाजता युवराज छत्रपती शहाजीराजे हे छत्रपती चौक येथे भेट देणार असून दुपारी २.२० वाजता छत्रपती शिवरायांना अभिवादन करून दुपारी २:३० वाजता लातूर शहरातील गंजगोलाई येथे आगमन होऊन आई जगदंबेची आरती करून ३:०० वाजता युवराज छत्रपती शहाजीराजे यांची स्वराज्य पक्षाचे उमेदवार सतीश करंडे यांच्या प्रचारार्थ गंजगोलाई येथून भव्य रॅली काढण्यात येणार आहे.या रॅलीस लातूर शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान परिवर्तन महाशक्ती आणि महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे उमेदवार सतीश करंडे यांनी केले आहे .

## लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील मतदान पथकांना ईव्हीएम हाताळणी प्रशिक्षण

लातूर (जिमाका): लातूर शहर विधानसभा मतदार संघाच्या मतदान प्रकियेतील मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी व इतर मतदान अधिकारी यांचे व्दितीय प्रशिक्षण १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी दयानंद महाविद्यालयामध्ये झाले. यावेळी त्यांना ईव्हीएम हताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले.






प्रशिक्षण दोन टप्पात घेण्यात आले पहिल्या सत्रात ८६६ आणि दुसऱ्या सत्रात ८६४ असे एकूण १ हजार ७३० नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणामध्ये तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून ईव्हीएम यंत्र हाताळण्याचे प्रात्यक्षिक व निवडणूक प्रक्रियेबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण स्थळी निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिकेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. अधिकारी, कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिकेद्वारे आपले मत नोंदवून लोकशाहीच्या महोत्सवात सहभाग नोंदविला. प्रशिक्षणास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती वर्षा ठाकुर–घुगे यांनी भेट देवून निवडणूकीच्या प्रशिक्षणास निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे – विरोळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार गणेश सरोदे यांची उपस्थिती होती.




## मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

लातूर : भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला. या दिनाकांपासून आदर्श आचारसंहिता लागू झाले आहे. मतदानादिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी लातूर जिल्ह्यामध्ये मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये हे आदेश निर्गमीत केले आहेत.

लातूर जिल्ह्यात ज्या ठिकाणी मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. त्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरात मंडपे, दुकाने उभारणे, तसेच मोबाईल फोन, स्मार्ट फोन, कॉर्डलेस फोन, पेंजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बाळगण्यास तसेच निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हाचे प्रदर्शन व निवडणुकीच्या कामा व्यतिरिक्त व्यक्तीस प्रवेश करण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. हा आदेश निवडणूकीचे कामे हाताळताना व कायदा व सुव्सवस्थेचा प्रश्र्न निर्माण होवू नये, म्हणून दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान सुरु झाल्यापासून मतदान संपेपर्यंत अंमलात राहणार आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## काय बोलता राव ?

रामलीला मैदानावर ज्या आरएसएस भाजपाच्या मंडळीनी म.गांधी, पंडीत नेहरु, यांच्या छायाचित्रासह संविधानाची प्रत जाळली, ती मंडळी भारतीय संविधानाचे रक्षण कसे काय करणार, हेच कळत नाही, असा स्पष्ट सवाल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी लातूरच्या सभेत उपस्थित केला. आणि भाजपा राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे धाबे दणानले.

**काय बोलता राव !**

अरे, खरचं आहे, स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचा सहभाग नव्हता, त्यावेळी भाजपाचा जन्म ही झाला नव्हता. त्याकाळी जनसंघ हा पक्ष कार्यरत असला तरी त्यांचे नेते, स्वतंत्र्यच लढ्यापासून दूर होते, त्यानी स्वतंत्र नंतर भारतीय संविधानाच्या संदर्भात बोलण्याचा हक्क नाही, परंतू आरएसएस आणि भाजपाची मंडळी संविधान विरा- धी असताना ही संविधानाचे रक्षण आम्हीच करु, कॉग्रेस संविधान विरोधी आहे, असा कांगावा भाजपा मंडळी करीत असल्यामूळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अमित शहा यांनी घटना दुरुस्तीच्या नावाखाली नागरी हक्क फौजदारी कायदे असे अनेक कलम, रद्द करुन ३७० हे कलम रद्द करुन जम्मू कश्मिरचे तुकडे पाडले अशा लोकांनी संविधानाचे रक्षणा बद्दल बोलणे, ही लाजीरवाणी बाब आहे असे स्पष्ट करुन, कॉग्रेस नेते खरगे यांनी महायुतीला हद्दपार करा असे आव्हाण केल्यामूळे भाजपा वर्तूळात उलटसूलट कुजबूज होत असून उद्याला महायुतीच्या संदर्भात काय घडेल हे सांगणे कठीण वाटते, मग बोला दाजीबा !

# जनतेच्या धाकातून राजकारण प्रगल्भ !

### संपादकीय...

लोकसभे पाठोपाठ विधानसभा निवडणूका महाराष्ट्राच्या राजकारणात रागरंगाने सर्वपक्षीय नेत्यामध्ये हमरीतूमरीवर आल्याचे चित्र दिसते आहे. व्यक्तीगत लाभाच्या राजकारणाने जोर धरला आहे, हे मान्यच करावे लागेल. पंरतू राजकारण, विचाराधिष्ठीत हवे या मताचा मी असल्याने असे राजकारण विचारावर आधारीत मुल्यांकीत प्रस्तावीत करायचे असेल तर सामान्य जनतेकडून दबाव आला पाहीजे, जनतेच्या धाकातूनच राजकारण प्रगल्भ होईल असे रोखठोक स्पष्टीकरण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर येथील एका पत्रकारांच्या मुलाखतीत स्पष्ट केल्यामूळे राष्ट्रीय स्वंयसेवक संघ आणि भाजपाच्या राजकारणासह प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या कारभारावर गडकरी यांनी गंडात्तर आणले की काय, अशीच प्रतिक्रिया सर्वसामान्य जनतेसह राजकीय वर्तूळात उमटताना दिसते आहे.

बटेगें तो कटेंगे,एक है तो सेफ है, अशा घोषणा मूळे संघाच्या हिंदूत्वाच्या व्याख्येतून पाहीले तर सर्वभारतीय यांना सामावून घेत असताना जातधर्मा पलीकडे बगीतले तर भारतीयांनी एक व्हावे असे म्हणने यात कांही गैर नाही. पंरतू बटेंगे कटेंगे हे शब्द आणि एक-सेफ हे असे शब्द कशाचे धोतक ठरतात याचा विचार करणे गरजेचे वाटते. त्यासाठी जन- तेचा धाक महत्वाचा ठरतो. त्याविना राजकारणात विचार व मुल्य यासह कार्यप्रणालीत प्रगल्भता येणार नाही, हा जो सुर नितिन गडकरी यांनी अवळला तो राष्ट्रीय स्वंयसेवक संघ आणि भाजपा मित्रत्वाला आत्मपरिक्षण करायला लावणारा ठरावा असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

निवडणूकीच्या जाहिरातीत काय नमूद केले आहे, हे मला माहिती नाही, अशी पुष्ठी ही गडकरी यांनी स्पष्ट केल्यामूळे त्यांच्या संदर्भातून आजच्या सत्ताकारणातील राजकारण संकुचीत आणि देशमुलक असावे असे म्हटल्यास गैर नस- ावे. केवळ जिंकण्यासाठी प्रचार केंद्रस्थानी ठेवला तर विकास आणि न्यायाची भिंत तकलादू होते, आणि राजकारण हे सत्तांकीत ठरु शकते, यातून प्रचार यंत्रणेतील संविधान बदला- चा जो मुद्दा सर्वपक्षीयाकडून घेतला जातो आहे, तो चूकीचा वाटतो. कलमाच्या दुरुस्तीच्या नावाखाली संविधान कमकुवत केले जाते आहे, ही बाब मान्य करावी लागेल, पंरतू भारताचे संविधान बदलण्याची हिम्मत कोणाच्यातही नाही. असे स्पष्ट करुन गडकरी यांनी शहा-मोदी यांना घरचा आहेर दिला अस- ावा की काय, अशी कुजबूज प्रसार माध्यमातून होताना दिसते आहे.

कारण असे की, व्यक्तीगत लाभाच्या योजनाकडे सर्वच पक्षाची धाव अग्रेसर दिसती आहे, करण्यापेक्षा घोषणातच लक्ष केंद्रीत करुन भारतीय सत्ताकारण व्यक्तीगत लाभाच्याच हेतूने पुढे जाताना दिसते आहे. त्यामूळे सर्वपक्षीय राजकारण्या संदर्भात जनतेचा धाक अग्रेसर ठरतो, या धाका शिवाय सत्त- ाधारी विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधीने वळणावर येणार ना- हीत याची खात्री स्पष्ट करुन गडकरी यांनी भाजपासह सर्वच राजकीय पक्षावर स्पष्ट मत व्यक्त करुन राजकारणी व्यक्तीला नवा धडा देण्याचा प्रयत्न केला, तो महत्वाचा ठरतो. बटेंगे कटेंगे, लाडकी बहीण, भाऊ, संविधान, न्याय व हक्क अशा विषयातून विकासाला पळवाट मिळते, मग महाराष्ट्रासह भारत महासत्ता कसा बनेल, या संदर्भात चिंतन करणे गरजेचे वाटते. भारतीयत्वाशी जोडणारी जात, पाथ, धर्म, पंथाला, भेदभावाला भारतात स्थानी पंरतू केवळ एक है तो सेफ हे म्हणून केवळ हिंदूत्वाचा डोंगारा पीटणे घातकी ठरते, त्यासाठी विविधतेने नटलेल्या भारतीय समुहाला सामाजीक ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या धाग्यात जोडणे गरजेचे वाटते. त्यामूळे जातीपाताच्या राजकारणाला लगाम देणे गरजेचे वाटते. त्यासाठी जनतेचा धाक महत्वाचा ठरतो. हे वारंवार स्पष्ट करीत असल्यामूळे उद्याच्या राजकारणात नितिन गडकरी यांची भुमिका न्यायीक ठरते, असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

आजकाल कोणत्याही निवडणूकीतून आपापल्या पक्षाला जिंकता यावे यासाठी सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करुन विकासा ऐवजी व्यक्तीगत लाभ पुढे करुन सर्वपक्षीय राजकीय नेत्यांची धडपड ही सामाजीक न्याय, आणि सर्वांगीण विकासाला तडा देणारी दिसते. त्यामूळे जनतेचा धाक हा विषय गडकरी यांच्या तोंडून रेटला जातो आहे. यातील मर्म लक्षात घेता प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांची कार्यपध्दती चूकीची असावी की काय, अशी शंका घेण्यास वाव मिळतो. त्यामूळे पक्षीय हिताच्या आणि व्यक्तीगत लाभाच्या योजनाकडे दुर्लक्ष करुन सर्वसामान्य जनतेनी आणि प्रशासकीय यंत्रणेनी राजकीय पक्ष नेत्यांना जाब विचारणे गरजेचे वाटते. असेच नितिन गडकरी यांना म्हणायचे आहे की काय अशीच उलटसूलट प्रतिक्रिया प्रसार माध्यमातून प्रकट होताना दिसते आहे.

वास्तवात आजघडीला कोणत्याही राजकीय पक्षाचा आमदार, खासदार, मंत्री हे स्वतःच्या पक्ष नेत्यासह पक्षाच्या आणि सत्तेतील विषयावर रोखठोक बोलू शकत नाही, पंरतू आजवरच्या सत्ताकारणात नितिन गडकरी यांची स्पष्ट भुमिका महत्वाची ठरते. ते रोखठोक बोलणारे सुप्रचित लोकप्रतिनिधी असल्यामूळे गडकरी यांच्या विधानाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

## महायुतीनेच समाजहिताच्या कल्याणकारी योजना राबवल्या -आ.विक्रम काळे

लातूर/प्रतिनिधी:राज्यातील महायुती



सरकारने समाजाती विविध घटकांसाठी कल्याणकारी योजना राबवल्या.यामुळे राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकारच स्थापन होणार असून त्यासाठी लातूर शहर मतदारसंघातून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना विजयी करण्याचे आवाहन शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी केले.

कस्तुराई मंगल कार्यालयात आयोजित शिक्षक संवाद बैठकीत आ.काळे बोलत होते.या बैठकीस उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह एस.एस.पाटील,शिवकुमार बिरादार,राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ आणि शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आ.विक्रम काळे म्हणाले की, महायुती सरकारने शेतकऱ्यांना एक रुपयात पिक विमा देण्याची योजना सुरू केली.नैसर्गिक आपत्तीमुळे ज्यांचे नुकसान झाले अशा शेतकऱ्यांना भरपाई दिली.पीएम किसान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दर वर्षी १२ हजार रुपयांची मदत केल्याचेही आ.काळे म्हणाले.

शिक्षकांसाठी या सरकारने सुधारित शिक्षक पेन्शन योजना लागू केली.त्यामुळे राज्यातील हजारो शिक्षकांना लाभ झाला. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणारच आहे.सरकार यावे यासाठी लातूर शहर मतदार संघातून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना विजयी करा. आपल्या लाडक्या बहिणीच्या पाठीशी खंबीर उभे रहा.स्टार प्रचारक म्हणून त्यांना विजयी करण्यासाठी काम करा,असे आवाहनही आ.काळे यांनी केले.

यावेळी बोलताना उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील यांनी शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण अग्रेसर राहू असे सांगितले.शिक्षक नवी पिढी घडवतात.त्या शिक्षकांना कसल्याही अडचणी राहू नयेत याची दक्षता आपण घेऊ,असेही त्या म्हणाल्या.

या संवाद बैठकीस विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी आणि शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## निवडणूक विषयक गैरप्रकार आढळून आल्यास निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याकडे माहिती देण्याचे आवाहन

लातूर : भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. यासाठी प्रचाराची कालावधी अंतिम टप्प्यात आहे. या काळात मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी मद्यवाटप, पैशांचे वाटप, मोफत भेटवस्तूंचे वाटप यासारख्या गैरप्रकारांचा वापर केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे असे प्रकार आढळून आल्यास नागरिकांनी याबाबतची माहिती ९२७०१५४५८४ या संपर्क क्रमांकावर अथवा सी-व्हीजील पद्वारे नोंदवावी, असे आवाहन निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार यांनी केले आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता २३४- लातूर ग्रामीण, २३५- लातूर शहर आणि २३६- अहमदपूर विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून भारत निवडणूक आयोगाने काकराला प्रसांत कुमार यांची नियुक्ती केली आहे. निवडणूक खर्च विषयक बाबींवर संनियंत्रण करण्यासाठी नियुक्त पथकांच्या कामकाजावर देखरेख करण्यासाठी निवडणूक काळात मतदारांना प्रलोभन दाखविणे, मोफत वस्तू, मद्य, रोकड याचे वाटप होवू नये, यासाठी निवडणूक खर्च निरीक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे असा कोणताही प्रकार आल्यास मतदारांनी याबाबतची माहिती निवडणूक खर्च निरीक्षक यांना दूरध्वनीद्वारे द्यावी अथवा सी-व्हीजील पवर याबाबतची तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जननायक बिरसा मुंडा

आज १५ ,नोव्हेंबर, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्र्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# समान वागणूक, समान न्याय, समान अधिकार हा कॉंग्रेसचा विचार - आमदार धिरज देशमुख

लातूर प्रतिनिधी - लोकसभेच्या निवडणुकीत लातूरच्या जनतेने खासदार निवडून दिला, मात्र तत्पूर्वी माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांना त्यांच्या पक्षाने लोकांपर्यंत पोहोचू दिले नाही. केवळ शिफारस पत्रे लिहून घेतली. आता कॉंग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर ते आपल्यासोबत खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. कारण कॉंग्रेसमध्ये नेहमीच समान वागणूक, समान न्याय आणि अधिकार या विचारांना सर्वोच्च महत्त्व असल्याचे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे महाविकास आघाडी कॉंग्रेसचे उमेदवार आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले.



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर बुधवारी धिरज देशमुख यांनी लातूर तालुक्यातील निवळी, काळे बोरगाव, शिराळा, पिंपरी अंबा या गावांना भेट देत संवाद बैठका घेतल्या. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी खासदार सुधाकर श्रृंगारे, लातूर तालुका कॉंग्रेस अध्यक्ष सुभाष घोडके, राजेसाहेब सवई, अनुप शेळके आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

धिरज देशमुख म्हणाले की, सध्याचे वातावरण पाहता महाविकास आघाडीला विजयाचा गुलाल लागल्याशिवाय राहणार नाही, याची खात्री आहे. लातूर ग्रामीण मतदारसंघातील जनतेने तीन वेळा कॉंग्रेस आमदार निवडून दिला आहे. आता विजयाचा चौकार मारायचा आहे, आणि या निवडणुकीत जे विरोधक पुन्हा एकदा नशीब अजमावत आहेत, त्यांच्या पराभवाची हॅटट्रिक करत आपल्याला विजय मिळवायचा असल्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

शेतकऱ्यांच्या समस्यांकडे सरकारचे दुर्लक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्र्नावर बोलताना देशमुख यांनी युती सरकारवर जोरदार टीका केली. महाराष्ट्रातील सत्ताधारी सरकारने षडयंत्र रचून महविकास आघाडी सरकार पाडले, आणि सत्ता स्थापन केली आहे. कोरोना नंतर महागाई बेरोजगारी हे प्रश्र्न प्रलंबित होते. शेतकरी सोयाबीनच्या भावासाठी संघर्ष करत असताना, हे सरकार आमदारांना विकत घेण्यात व्यस्त राहिले. आमदारांची किंमत लावून लोकशाहीची चेष्टा केली जात असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

देशमुख यांनी पुढे बोलताना सांगितले की, लोकनेते विलासराव देशमुख यांनी निवळीच्या माळरानांवर कारखाना उभा करून उसाच्या गाळपाचे काम सुरु केले. शेतकऱ्यांना ऊसाचा चांगला दर मिळेल, रोजगार निर्मिती केली जाईल ही आश्र्वासने आज पूर्ण झाली आहेत . कॉंग्रेसने कारखाने व बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत केली आहे. आता आगामी काळात महाविकास आघाडी सत्तेत आल्यावर बेरोजगारांना चार हजार रुपये आणि महिलांना महालक्ष्मी योजनेतून तीन हजार रुपये मिळणार आहेत, असे त्यांनी जाहीर केले. शेतकऱ्यांच्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी कॉंग्रेस कटिबद्ध असून, कॉंग्रेस है तो देश सेफ है या शब्दांत त्यांनी विश्र्वास व्यक्त केला.

देशमुख यांनी सरकारवर जोरदार टीका करताना म्हटले की, विरोधात असताना सोयाबीनला ६,००० रुपये भाव मागणारे सत्तेत असताना भाव देत नाहीत. त्यामुळे अशा सरकारला मतदान मागण्याचा अधिकार नाही. खोटी आश्र्वासने देऊन, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या जागी त्यांनी अंबानी आणि अदानी यांच्या संपत्तीची वाढ केली, असल्याचा टोलाही त्यांनी लगावला.यावेळी देशमुख यांनी कॉंग्रेसच्या विचारधारेवर भर देत, शेतकरी आणि कामगारांसाठी कॉंग्रेस नेहमीच लढत राहील, असा निर्धार व्यक्त केला.

# चांगल्या गणित शिक्षकाने योग्य मार्गदर्शन केल्यास प्रत्येकाला गणिततज्ज्ञ होता येते : गीताताई महाशब्दे

लातूर : अनेकांना गणित हा विषय अतिशय क्लिष्ट, अवघड आहे असे वाटत असते. पण हा विषय जर एखाद्या चांगल्या गणित शिक्षकाने योग्य मार्गदर्शन करून शिकवल्यास प्रत्येकाला गणिततज्ज्ञ होता येते, असे प्रतिपादन पुण्याच्या नवनिर्मिती फाऊंडेशनच्या गणिततज्ज्ञ गीताताई महाशब्दे यांनी केले.



येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात स्व. नंदकिशोर भार्गव शिक्षण अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या गणित शिक्षक प्रशिक्षणाच्या उदघाटन समारंभात त्या मार्गदर्शन करत होत्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल , कोषाध्यक्ष जयेश बजाज, चैतन्य भार्गव , सुभाष कासले , व्यंकट गर्जे , सूर्यप्रकाश धूत, पपरुनिया , मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदींची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षण कार्यक्रमात श्रीकिशन सोमाणी, केशरबाई भार्गव , गोदावरीदेवी लाहोटी कन्या आदी विद्यालयांतील शिक्षकवृंद सहभागी झाले आहेत. हे प्रशिक्षण तीन दिवस चालणार आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे संस्थापक सचिव स्व. नंदकिशोर भार्गव यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. गीताताई महाशब्दे, त्यांच्या सहकारी सुषमा बक्षी यांचे संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना गीताताई महाशब्दे यांनी गणित हा विषय वाटतो किंवा आपण समजतो तेवढा नक्कीच क्लिष्ट नसल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या मनात गणिताबद्दल असलेली अनाहूत भीती कमी करण्याच्या उद्देशाने आपण राष्ट्रभाषा शिकवल्याप्रमाणे गणित विषय शिकवता येईल का, या उद्देशाने २००० साली हा प्रयोग सुरु केला. गणित विषयाची भीती बाळगू नये. योग्य मार्गदर्शनाने गणितावर प्रभुत्व मिळवणे शक्य आहे. जगातले प्रत्येक मूल गणितात प्राविण्य मिळवणारे झाले पाहिजे हाही आपला मूळ उद्देश्य आहे. गणित प्रत्येकाला येते. पण आपल्याला कोणी ते शास्त्रोक्त भाषेत शिकवत नाही, म्हणून ते अवघड वाटते. पहिलीपासून दहावीपर्यंत गणित सोप्या पद्धतीने कसे शिकवायचे हे या उपक्रमाच्या माध्यमातून आपण सांगणार आहोत. या उपक्रमाचा गणित विषय शिक्षकांना नक्कीच लाभ होणार आहे व त्यांचे विद्यार्थीही नजीकच्या काळात गणितात कुशाग्र बुद्धीचे झाल्याचे पाहावयास मिळेल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल, चैतन्य भार्गव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमाकांत स्वामी यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी या अभियानाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भाग्यश्री पोतदार यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी यांनी केले.

# लातूरकरांचा गुदमरलेला श्र्वास मोकळा करण्यासाठी मैदानात - डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर




लातूर प्रतिनिधी : मागच्या अनेक वर्षांपासून कचऱ्यामुळे लातुरकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे.वाढत्या मूलभूत समस्यांमुळे लातूरकरांचा श्र्वास गुदमरत आहे. लातूरला विकासाच्या वाटेवर घेऊन जाण्यासाठी,मूलभूत समस्यांची सोडवणूक करून लातूरकरांचा गुदमरलेला श्र्वास मोकळा करण्यासाठी मी मैदानात उतरले असल्याचे लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी सांगितले.

संविधान अमृत महोत्सवानिमित्त शहरातील विलासनगर येथे डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या उपस्थितीत संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ.अर्चनाताई बोलत होत्या.व्यासपीठावर शैलेश गोजमगुंडे,संजय कांबळे, जयकुमार सकट,कावेरीबाई सकट,सचिन काळे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. अर्चनाताई म्हणाल्या की, महायुतीचे भाऊ देवेंद्र फडणवीस,एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेतून लाडक्या बहिणींना पैसे नाहीतर 'सन्मान' मिळवून दिला आहे.आर्थिक सक्षम झाल्याने महिलांना कोणापुढे हात पसरण्याची गरज पडणार नाही.लातूरच्या नेतृत्वाने कधीही आपल्या परिसरात येऊन येथील नागरिकांचे सुख दुःख जाणून घेतले नाही.ज्या कामावर येथील नागरिकांचे जीवन अवलंबून होते ती कचरा संकलनाची निविदा रद्द करुन उपासमारीची वेळ आणली आहे. या निवडणुकीत आपल्या हक्कासाठी मी मैदानात उतरले आहे.आपल्याशी संवाद आणि संपर्क कधीही तुटू देणार नसल्याची ग्वाही यावेळी डॉ. चाकूरकर यांनी यावेळी दिली.

यावेळी बोलताना शैलेश गोजमगुंडे यांनी सांगितले की, केवळ कमिशन मिळत नसल्याने जनाधार संस्थेची निविदा रद्द करण्यात आली.जनाधार संस्थेच्या २७० कर्मचाऱ्यांना घरी बसवून गोरगरिबांच्या तोंडचा घास काढून घेणाऱ्या आमदाराला घरी बसवण्यासाठी, आपल्या लाडक्या बहिणीला प्रचंड मतांनी निवडून द्यावे,असे आवाहनही गोजमगुंडे यांनी केले.

या मेळाव्यास संतोष कांबळे, श्रीहरी काळे,सुधीर कांबळे, विकी कांबळे,अमर सकट, विशाल कावळे,संदिपान काळे, करण कसबे,सुनिल सकट, आकाश सकट आदींसह विलास नगरातील रहिवासी,महायुतीचे कार्यकर्ते,पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चार वर्षात कोट्यावधी रुपयांची विकास कामे केली;काँग्रेसने पंधरा वर्षात काय केले जनतेला जाहीर सांगा खरोळा येथील प्रचार जाहीर सभेत महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड






लातूर – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात गेल्या पंधरा वर्षापासून काँग्रेसचे आमदार आहेत या आमदारांनी काय केले कोणती विकासाची कामे केली हे एकदा जनतेला जाहीर सांगा. गेल्या चार वर्षात मतदार संघातील गावागावांत विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी आणण्यात मला यश आले. काँग्रेसची पंधरा वर्ष आणि माझ्या चार वर्षातील विकास कामाचा लेखात जोखा मांडण्यासाठी एका व्यासपीठावर यावे असे काँग्रेसला जाहीर आवाहन देऊन काँग्रेसला पंधरा वर्षे दिली आता मला पाच वर्ष काम करण्याची संधी द्या राज्यात लातूर ग्रामीण मतदार संघ विकासाचा एक मॉडेल करून दाखविन अशी ग्वाही भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथे भाजपा महायुतीच्या प्रचारार्थ बुधवारी सायंकाळी जाहीर सभा झाली. या सभेला खरोळा आणि परिसरातील मतदार आणि महायुतीचे कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. या सभेस महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अँड बळवंतराव जाधव, जिपचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, भाजपाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश गोडभरले, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, फकीरा ब्रिगेडचे प्रा संजय शिंदे, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, सांगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, शिवसेनेचे कुलदीप ठाकूर, रिपाईचे धम्मानंद घोडके, अनंत चव्हाण, बायनाबाई साळवे, वसंतराव दहिफळे, श्रीकृष्ण मोटेगावकर, अमर चव्हाण, लक्ष्मण यादव, शरद दरेकर, नामदेव बोबंडे, अजय शेळके, मोहन राऊतराव, अनिरुद्ध आडतराव, सुधाकर काळे, वसंत कनामे, हनुमंत राऊतराव, अनिल येलगटे, रमाकांत फुलारी, सचिन आडतराव, चंद्रकांत आदुडे, बालाजी मानमोडे, बाळूआप्पा हेणे, भाऊसाहेब गुळबिले, सुरेश बुड्डे, निवृत्ती चिद्रे, नानासाहेब माने, संगमेश्वर तत्तापूरे, ओम चव्हाण, राम बडे, शिवाजी उपाडे, शरद राऊतराव, दिलीप बरुरे, राजू कांबळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या संस्कारात वाढलेला मी कार्यकर्ता आहे मुंडे साहेबांनी ज्या दिवशी माझ्यावर या लातूर ग्रामीण ची जबाबदारी दिली त्या दिवसापासून या मतदार संघाची प्रामाणिकपणे सेवा करीत असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या निवडणुकीत पैशाच्या जोरावर मतदार संघ विकत घेण्याचा प्रयत्न झाला मात्र मतदाराने नोटाला विक्रमी मतदान केल्याने पक्षश्रेष्ठींनी मला आमदारकी दिली मिळालेल्या आमदारकीच्या माध्यमातून गोरगरीब सर्वसामान्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे काम केले. मतदार संघातील गावागावात कोट्यावधी रुपये खर्चाची विविध विकास कामे केली खरोळा, पांढरी, रेणापूर, पानगावसह मतदारसंघातील तब्बल साडेतीनशेहून अधिक मंदिराचा जिर्णोद्धार केला खरोळा जिल्हा परिषद मतदार संघातील गावागावात वाढीवस्तीत ७५ ते ८० कोटी रुपयांची कामे झाली असल्याचे सांगून निवडून गेलेले काँग्रेस आमदार पुन्हा गावात आले का त्यांनी कोणती कामे केली असा प्रश्न उपस्थित करून निष्क्रिय आमदाराला धडा शिकवण्याची हीच वेळ असल्याचे बोलून दाखवले.

उसाच्या टिपऱ्याचे राजकारण होऊ देणार नाही शेतकऱ्याचे हित डोळ्यासमोर ठेवून मी ही साखर कारखाना उभा केला आहे. महिनाभरात गाळप सुरू होईल निश्चितपणे मांजरा परिवारापेक्षा शंभर रुपये तरी अधिक भाव देईल असे सांगून लाडक्या बहिणीसह विविध योजना या पुढील काळातही सुरूच ठेवण्यासाठी आणि मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी येत्या २० तारखेला कमळाच्या चिन्हा समोरील बटन दाबून मतदारांनी सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख बळवंत जाधव म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यभर काँग्रेसचा विरोध केला सत्ता आल्यानंतर स्वतः मुख्यमंत्री झाले नाहीत मनोहर जोशी, नारायण राणे यांना संधी दिली. गेल्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी लातूर ग्रामीणचा सौदा करून शिवसैनिकाचा केसांनी गळा कापला. बाळासाहेबांनी आयुष्यभर ज्या काँग्रेसचा विरोध केला त्याच काँग्रेसच्या मांडीवर उद्धव ठाकरे जाऊन बसले आणि स्वतः मुख्यमंत्री झाले स्वतःच्या मुलाला मंत्री केले असे सांगून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी अनेक जनहिताची कल्याणकारी कामे केली आहेत. काँग्रेस आमदाराला भेटणे सुद्धा शक्य नाही मात्र रमेशआप्पांचा दरवाजा चोवीस तास उघडा असतो तेव्हा आपल्या हितासाठी गावच्या विकासासाठी आणि मतदारसंघाच्या प्रगतीसाठी रमेश आप्पांनाच प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

भाजपाच्या पाच तालुकाध्यक्ष ची नावे सुद्धा सांगता येत नाहीत अशा माणसाला जिल्हा परिषद सदस्य आणि खासदार केले दुसऱ्यांदा उमेदवारी दिली मात्र पक्षाने दिलेल्या सन्मानाची जाणीव न ठेवता स्वार्थाने चुकीचे वक्तव्य करीत आहेत रमेशआप्पा कराड निवडून आल्यानंतर शंभर टक्के मंत्री होणार असे माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड यांनी बोलून दाखवले. गोपीनाथ मुंडे आणि विलासराव देशमुख यांच्या विचाराचा वारसा रमेशआप्पा कराड यांच्या कार्यातून दिसून येतो त्यांनी जातीपातीच्या पलीकडे जाऊन मतदार संघातील गोरगरीब सर्वसामान्यांच्या हितासाठी अनेक योजना राबवल्या गावागावात हजारो कोटीचा निधी आणून विकासाच्या योजना कार्यान्वित केल्या. आप्पांचा विजय आता कोणतीच शक्ती रोखू शकत नाही असे रामचंद्र तिरुके यांनी सांगितले.

या सभेत युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी अत्यंत प्रभावी आणि दमदार भाषण केले. मतदान यंत्रावर दोन क्रमांकावर जरी रमेशआप्पांचे कमळ चिन्ह असले तरी निकालातून क्रमांक एकचे होणार असल्याचे सांगून विरोधकांनी कितीही चिखल फेक केला तरी याच चिखलातून कमळ उगवल्याशिवाय राहणार नाही असे बोलून दाखविले. सभेला उपस्थित असलेल्या मतदारांनी ऋषिकेश दादा यांच्या भाषणाला मोठी दाद दिली. यावेळी प्रा. संजय शिंदे, नवनाथ भोसले, सुरेश बुड्डे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून आमदार रमेश आप्पा कराड यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी डॉ. महेंद्र पिंपळे यांनी उपस्थित यांचे आभार मानले. खरोळा येथील जाहीर सभेला मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला लाडक्या बहिणीही या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# जनतेला फसविणाऱ्यांना सत्तेतून पायउतार करा - आमदार धीरज देशमुख



लातूर/प्रतिनिधी:राज्यातील महायुती सरकारने जनतेची फसवणूक केली आहे.या सरकारला पायउतार करण्याचे काम आपल्याला करायचे आहे. त्यासाठी २० तारखेच्या मतदानातून मला आपल्या सेवेत रुजू करून घ्या आणि महायुती सरकारला पायउतार करा,असे आवाहन लातूर ग्रामीण मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा उमेदवार धीरज देशमुख यांनी केले.

आ.देशमुख यांनी पिंपरी आंबा,बोरगाव बु.,शिराळा व निवळी येथे पदयात्रा काढून सभाही घेतल्या.यावेळी नागरिकांशी संवाद साधताना ते बोलत होते.आ.देशमुख म्हणाले की,आपण लोकसभा निवडणुकीत परिवर्तनाला सुरुवात केली.काँग्रेसचा खासदार निवडून आणला. भाजपाच्या अटकेतून माजी खासदार सुधाकर शृंगारे यांना बाहेर काढत त्यांनाही व्यासपीठ मिळवून दिले.महायुती सरकार सोयाबीनला भाव देत नाही पण त्यांच्याकडे आमदारांसाठी भाव आहे.हे असे चालणार नाही. लोकशाहीची चेष्टा महायुती करत आहे. ती आपल्याला थांबवायची आहे.त्यामुळे मला रुजू करून घ्या,असे आवाहन त्यांनी केले. आपल्यासमोर जे उमेदवार आहेत ते मागील दोन निवडणुकांत पराभूत झाले आहेत.त्यांच्या पराभवाची हॅट्रिक करा,असेही आ.देशमुख यावेळी म्हणाले.

यावेळी बोलताना माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी सांगितले की,मला भाजपा आमदारांनी त्यांच्या मतदारसंघात फिरवले पण निवडणुकीत मात्र दगा दिला. त्यामुळेच मी काँग्रेसमध्ये आलो. आ.धीरज देशमुख हे स्व. विलासराव देशमुख यांचे स्वप्न पूर्ण करू शकतात.त्यामुळे त्यांना बहुमताने विजयी करा,असे आवाहनही शृंगारे यांनी केले.

आ.धीरज देशमुख यांच्यासमवेत सुभाष घोडके, अनुप शेळके,विनोद माने,राजेसाहेब सवई, तात्यासाहेब पालकर,विलास नाना भिसे,शत्रुघ्न भिसे,अशोक भिसे,अरुण भिसे,नवनाथ भिसे यांची उपस्थिती होती.बोरगाव येथे अंगद जाधव व हनुमंत जाधव यांच्यासह काँग्रेस व महाविकास आघाडीचे असंख्य पदाधिकारी,कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ.धीरज देशमुख यांच्या पदयात्रा आणि बैठकांना लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात नागरिक व मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# मी विकासाच्या मुद्यावर निवडणूक जिंकणार - आ अभिमन्यू पवार



औसा – निवडणूक विकासाच्या मुद्यावर झाली पाहिजे. जनतेने निवडून दिल्यानंतर जनतेच्या प्रश्र्नासंदर्भात लोकप्रतिनिधीने काय काम केले आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी किती निधी उपलब्ध केला त्यामधून काय विकासकामे केली हे सांगणे आवश्यक असताना या सर्व महत्त्वाच्या विषयाला बगल देत विरोधकाकडून जनतेची दिशाभूल करण्याचे काम सुरू आहे. जनतेने निवडून दिल्यानंतर दहा वर्षांत मतदारसंघाच्या विकासात तुमचे काय योगदान आहे हे जनतेला सांगा मी माझ्या पाच वर्षांत केलेले विकासकामे सांगतो. मी जनतेच्या प्रश्र्नासंदर्भात विधीमंडळात शेकडो प्रश्र्न उपस्थित करून जनतेच्या प्रश्र्नासंदर्भात भांडलो आहे. तुम्ही काय केले ते सांगा असा सवाल आमदार अभिमन्यू पवार यांनी विरोधकांना केला आहे.

मतदारसंघातील गुळखेडा, गुळखेडा वाडी, तावशीताड, चिंचोली काजळे व मासुर्डी येथील जनतेशी (दि.१३) रोजी आमदार अभिमन्यू पवार यांनी संवाद साधला त्याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की मतदारसंघातील चौफेर विकासासाठी मी पाच वर्षांत भरघोस निधी उपलब्ध करून मतदारसंघातील जनतेच्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम केले आहे. हे करीत असताना जनतेच्या हितासाठी विधीमंडळात शेकडो प्रश्र्न उपस्थित करून येथील जनतेच्या प्रश्र्नासंदर्भात न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. त्यामुळे गोगलगाय प्रादुर्भावाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शंभर कोटींची मदत त्या माध्यमातून देण्यात आली. जनावरांच्या गोट्या साठी अगोदर सहा जनावरांची अट होती ती शिथिल करून केवळ दोन जनावरांची अट ठेवण्यात आली त्यांमुळे अडीच हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना जनावरांच्या गोटयाचा लाभ घेता आला.सिंचन विहीरीचे अनुदान वाढी संदर्भात मी केलेल्या पाठपुराव्यामुळे तीन लाखांवरून हे अनुदान आता पाच लाखापर्यंत होवू शकले. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे धोरण आखून लामजना, बोरफळ व कासारसिरसी शाळा अद्ययावत करण्याचे काम केले ज्यामुळे गोरगरिबांच्या मुलांना दर्जेदार शैक्षणिक सुविधासह क्रीडा व मैदानी खेळातील खेळाडू निर्माण होण्यासाठी संधी उपलब्ध करून दिल्या शेतकऱ्यांना पुर्ण क्षमतेने वीजपुरवठा व्हावा यासाठी मतदारसंघात १० नवीन वीज उपकेंद्राची निर्मिती केली जात आहे. ज्यामुळे येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना सुरळीत व उच्च दाबाने विद्युत पुरवठा होईल.हे ना असे शेकडो कामे मी या पाच वर्षांत केले आहेत. तुम्ही दहा वर्ष आमदार म्हणून काम केले तुम्ही एकतर काम जनहिताचे सांगा असा सवाल विरोधी उमेदवाराला आमदार अभिमन्यू पवार यांनी करीत या पाच वर्षांत जातीय सलोखा ठेवून समाजाच्या प्रत्येक घटकाला समान न्याय देण्याच्या भूमिकेतून काम केले असल्याचा दावा केला आहे.

# लातूर ग्रामीणमधील भाजप युवक कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश



लातूर प्रतिनिधी – लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या पूर्व भागातील बोरी, शिवणी खु., चामेवाडी, धनेगाव, उमरगा, बाभळगाव येथील भाजपच्या असंख्य युवक कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. बाभळगाव येथे झालेल्या या प्रवेशामुळे लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांचे राजकीय बळ वाढले आहे. काँग्रेस पक्षाच्या नेतृत्व आणि ध्येयधोरणांवर विश्र्वास ठेवून, या युवकांनी पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी अंतिम टप्प्यात आली आहे. त्यातच लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार धिरज देशमुख यांचे पारडे जड झाल्याचे दिसून येत आहे. धिरज देशमुख यांच्या कामाची पद्धत पाहून अनेक पक्ष संघटनातील युवक कार्यकर्ते पदाधिकारी धिरज देशमुख यांच्या सोबत येत आहेत. त्याप्रमाणे गुरुवारी देखील लातूर ग्रामीणमधील भाजप युवक कार्यकर्त्यांनी देखील काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

यावेळी प्रशांत मोमले रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली आकाश भगत , गणेश पडिले , नरेश मलवाडे , निलेश बरुरे , चंद्रपाल चौहाण , प्रसाद आगराळे , ज्ञानेश्र्वर बरुरे , महेबूब शेख , हर्षवर्धन केसरे , सिद्धेश्र्वर भोसले , ऋषिकेश भिंगोले , दीपक मंदाडे , शुभम बेंबडे , आकाश जाधव , महेश जाधव , अफरोज शेख , अर्जुन डोपे , अनिकेत बेडदे , परमेश्र्वर जाधव , दिनेश पवार , प्रवीण ढोबळे , सुमित कांबळे , चैतन्य ढोबळे , अभि वाघमारे , पियुष अनंतवाड , रोहित ढोबळे , अनिकेत ढोबळे , प्रदीप ढोबळे , ऋषी ढवारे , शेखर ढोबळे , सोमनाथ भालके , सचिन बालणे , धीरज बालणे , किशोर बेवनाळे , शेखर शिरसाट , अवधूत फासके , अनिकेत चपटे , आयान सय्यद , खाजा शेख , समीर शेख , रेहान सय्यद , यश भंडे , आदित्य कैले , सौरभ कासले , राहुल कलकुटे , राहुल मलवाडे , अभिषेक बाळसरप , निलेश मिरकले , प्रशांत माळी , दीपक बोंबडे , किशोर जाधव , संदेश जाधव , संजय लतापुरे , प्रशांत ढोबळे , अमित सौदागर , किरण पाटोळे , तय्यब सय्यद , इब्राहिम शेख , फिरोज शेख , ओमराज जाधव आदींसह अनेक भाजप पक्षातील युवकांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

या प्रसंगी ट्वेन्टीवन साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, लातूर जिल्हा बँकेचे संचालक अनुप शेळके, युवक काँग्रेसचे जिल्हा सचिव यशवंत कदम आणि इतर काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, धिरज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष मजबूत होत असून, विशेषतः युवा वर्गाच्या मोठ्या संख्येने पक्षात प्रवेश केल्यामुळे पक्षाला मोठे राजकीय बळ मिळाले आहे.

## सारसा येथील असंख्य मुस्लिम बांधवांचा भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश

लातूर :लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून लातूर तालुक्यातील मौजे सारसा येथील असंख्य मुस्लिम बांधवांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या पक्ष कार्यक्रमास भाजपाचे किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, रेणापुरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे रेणापूर तालुका अध्यक्ष अँड दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, कारसा येथील चेअरमन शरद शिंदे, सय्यद लाला यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते लातूर तालुक्यातील मौजे सारसा येथील इस्माईल पठाण, समीर सय्यद, अक्खर पठाण, किस्मत पठाण, सलीम पठाण, सोहेल पठाण, शहबाज पठाण, अलीसा पठाण, अल्ताफ पठाण, मिठू सय्यद, एजाज पठाण, सलार पठाण यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला यावेळी आ. कराड यांनी सर्वांचे स्वागत केले. कोणाच्याही विश्र्वासाला तडा जाणार नाही असे सांगून लातूर ग्रामीण मतदारसंघात परिवर्तन शंभर टक्के होणार आहे ही काळा दगडावरची पांढरी रेघ असून आपण सर्वांनी भाजपा महायुतीला मताधिक्य मिळावे यासाठी मेहनत घ्यावी असे आवाहन केले.

# मुलांना अभ्यासाचा ताण जाणवत असेल तर आधी पालकांनी शिकाव्यात 'या' ५ गोष्टी

लहान मुलांना अभ्यास करताना खूप त्रास होतो. त्यांना अभ्यासात रस नाही. अशा परिस्थितीत मुलांना लहानपणापासूनच अभ्यासाची सवय लावायला हवी. यामुळेच तुमच्या मुलांना लहानपणापासूनच विषयात चांगले गुण मिळतील. राग आल्यावर अनेक वेळा आपण मुलांना शिव्या देतो. टोमणे मारल्याने मुले हट्टी होत असली तरी त्यामुळे त्यांना अभ्यासाची जाणीव होत नाही.

अभ्यासात मन का लागत नाही?

अनेकदा विद्यार्थ्यांची तक्रार असते की, त्यांना अभ्यास करावासा वाटत नाही. 'आपण अभ्यास करण्याचा खूप प्रयत्न करतो पण आपल्याला अभ्यास करावासा वाटत नाही आणि आपण अभ्यासाला बसलो की आपलं मन भरकटायला लागतं' असं म्हणतात. फक्त, हा सगळा मनाचा खेळ आहे. जर तुम्हाला अभ्यास करायचा असेल पण काही कारणास्तव तुम्ही त्यावर लक्ष केंद्रित करू शकत नसाल तर सर्वप्रथम तुम्ही अभ्यासाचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे.

अभ्यासाची वेळ निश्चित करा

तुमच्या मुलांनी त्यांच्या अभ्यासात लक्ष घालावे असे तुम्हाला वाटत असेल तर त्यांची अभ्यासाची वेळ निश्चित करा. तुमचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी तुम्ही काही उपक्रमांची मदत घ्यावी. अशा परिस्थितीत त्याला स्वतःला अभ्यास करावासा वाटेल. लहानपणापासून त्यांना दररोज २ तास



अभ्यास करायला लावा. जेणेकरुन ते मोठे झाल्यावर त्यांना स्वतःहून बोलण्याची आणि अभ्यासाला सुरुवात करावी लागणार नाही.

अभ्यासाचे ध्येय ठेवायला शिकवा

तुम्ही मुलांना त्यांच्या अभ्यासाबाबत त्यांचे स्वतःचे ध्येय तयार करण्यास सांगावे. आपल्या समाजात शिक्षणाचे किती महत्त्व आहे, हे त्यांना सांगितले पाहिजे. अशा स्थितीत त्यांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. अशा परिस्थितीत त्यांनाही अभ्यास करावासा वाटेल.

अभ्यास समजून घ्यायला शिकवा

लहान मुलाला अभ्यास लक्षात ठेवण्यापेक्षा आधी समजून घेण्यास सांगा. याचे कारण असे की, अनेक वेळा आपण आपल्या लक्षात असलेल्या गोष्टी विसरतो. जर तुमचे मूल लक्षात ठेवण्यावर जास्त भर देत असेल तर तुम्ही त्याला काळजीपूर्वक अभ्यास कसा करावा हे सांगा. मुलांना अभ्यास करताना फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यास सांगा. असे केल्याने त्याला गोष्टी लवकर समजतील.

नियमित ब्रेक घ्या

अभ्यास करताना नियमित ब्रेक घेऊन तुम्ही तुमची एकाग्रता वाढवू शकता. उदाहरणार्थ, जर तुम्हाला खूप वाचायचे असेल, तर १५ ते २० मिनिटे वाचल्यानंतर लहान ब्रेक घ्या. हा ब्रेक एका मिनिटापेक्षा कमी काळ टिकेल. हे ब्रेक मेमरी पॉवर सुधारण्यास तसेच धोकादायक झोनिंग-आउट प्रभाव टाळण्यास मदत करू शकतात. लक्षात ठेवा, ब्रेक दरम्यान ईमेल इत्यादी तपासू नका किंवा कॉल घेऊ नका. सर्व व्यत्यय टाळून तुमच्या वेळेचा काही भाग अभ्यासासाठी देऊन तुम्ही अधिकाधिक विषयांचा समावेश करू शकता.

# तुम्ही आपल्या मुलाला अशा प्रकारे हवेत फेकता का? निष्पाप पडू शकतो या मानसिक आजाराला बळी

अनेकदा लोक प्रेमात लहान मुलांना हवेत उडवतात. ही सवय बऱ्याच लोकांमध्ये सामान्य आहे, परंतु तुम्हाला माहित आहे का की असे केल्याने मुलाचा मृत्यू होऊ शकतो. होय, हवेत फेकल्याने मुलांच्या मेंदूवर परिणाम होण्याचा धोका असतो. यामुळे तो शेकन बेबी सिंड्रोमचा बळी ठरू शकतो. या सिंड्रोममुळे मुलाच्या मेंदूच्या पेशी खराब होतात. सिंड्रोममुळे मुलाचा मृत्यू होण्याचा धोका असतो.

डॉक्टर सांगतात की मुलांना टॉस करताना त्यांचे डोके मागे जाते. अनेक प्रकरणांमध्ये, कवटीच्या आतील मेंदू देखील हलवू शकतो. याचा मनावर परिणाम होऊ शकतो. मुलाच्या मेंदूमध्ये जळजळ होण्याचा धोका देखील असतो. ज्यामुळे त्याच्या मेंदूला खूप नुकसान होऊ शकते. ही स्थिती शेकन बेबी सिंड्रोम बनू शकते. या सिंड्रोममुळे मुलाची मेंदूची वाढ थांबू शकते. न्यूरोलॉजिकल रोगाचा धोका आहे आणि मानसिक आरोग्य देखील बिघडू शकते. मुलाला हवेत फेकण्याव्यतिरिक्त, हे सिंड्रोम त्याचे डोके जोरदारपणे हलवल्याने देखील होऊ शकते.



अनेक प्रकरणांमध्ये मूल जरी या सिंड्रोमचे बळी ठरले, तरी पालकांना त्याची माहिती मिळत नाही. मुलाला काही प्रॉब्लेम असला तरी त्यामागचे कारण दुसरे काही आहे, असे पालकांना वाटत असले तरी ते आवश्यक नसते. जर मुलाला मेंदूशी संबंधित काही समस्या असतील, तर ते शेक बेबी सिंड्रोम देखील असू शकते, जे मुलाला हवेत उडवल्यामुळे झाले आहे.

न्यूरोसर्जन डॉ. राजेश कुमार स्पष्ट करतात की शेकन बेबी सिंड्रोमला हेड ट्रॉमा आणि शेकन इम्पॅक्ट सिंड्रोम असेही म्हणतात. हे सिंड्रोम ओळखणे फार कठीण आहे. सिंड्रोममुळे, मुलाच्या मेंदूला पूर्णपणे नुकसान होऊ शकते. त्यामुळे मृत्यूचा धोका निर्माण झाला आहे. चिंतेची बाब म्हणजे हा आजार सहजासहजी आढळत नाही.

कारण बाळाला फेकताना मेंदूवर परिणाम होतो, पण शरीरावर कोणतीही खूण नसते. अशा परिस्थितीत, लक्षणे ओळखणे कठीण होते, जरी असे काही मार्ग आहेत ज्याद्वारे आपण शोधू शकता की मूल या सिंड्रोमचा बळी आहे.

ही लक्षणे दिसून येतात

- न थांबता उलट्या
- अचानक भान हरपणे
- धाप लागणे
- बेशुद्ध होणे जे कित्येक तास टिकते
- त्वचेचा रंग निळसर होणे

डॉ कुमार म्हणतात की बहुतेक लोकांना या सिंड्रोमबद्दल माहिती नसते. मुलांना न्यूरो डिसऑर्डर झाल्याची अनेक प्रकरणे येतात. शेकन बेबी सिंड्रोम हे याचे संभाव्य कारण असू शकते. अशा परिस्थितीत मुलांना हवेत फेकणे टाळण्याचा सल्ला लोकांना दिला जातो. अनेक प्रकरणांमध्ये, रागात असतानाही लोक मुलांचे डोके जोरदारपणे हलवतात. हे करणे देखील टाळले पाहिजे.

# लाहोटी स्कूलच्या विद्यार्थ्यांची शिवनेरी गडावर यादगार भ्रमंती

लातूर : राजा नारायणलाल लाहोटी कडेलोट टोक आदि महत्वपूर्ण बाबी



इंग्लिश स्कूलच्यावतीने इयत्ता ८ वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी रविवार, सोमवार आणि मंगळवार असे तीन दिवसीय ऐतिहासिक शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीमध्ये निसर्गाचा एक अद्भुत चमत्कार सांधण दरी, नाणेघाट, छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असलेला शिवनेरी किल्ला आणि बाबासाहेब पुरंदरे यांच्या संकल्पनेतून साकारलेली भव्य शिवसृष्टी आदि स्थळांचा विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या.

महाराष्ट्राला लाभलेला निसर्गाचा वरदहस्त म्हणजे 'सह्याद्री'. सह्याद्रीच्या कुशीत लपलेली भुरळ घालणारी अनेक ठिकाणे आहेत. याच निसर्गाच्या कुशीत दडलेलं अहमदनगर जिल्ह्यातल्या साम्रद या गावातून पुढे दीड ते दोन किमी नागमोडी वळणे घेत जाणारी 'सांधण दरी' या दरीला सहलीच्या पहिल्या दिवसी म्हणजे रविवारी विद्यार्थ्यांनी भेट देत ट्रेकिंगचा अद्भुत अनुभव घेतला. नंतर दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी शिवनेरी गडाच्या पवित्र भूमीत पाऊल ठेवले. विद्यार्थ्यांना ओढ लागली होती ती शिवनेरी चढायची, इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या शिवरायांच्या जन्म स्थळाला भेट देण्याची. महाराज ज्या किल्ल्यावर जन्मले, खेळले, लहानाचे मोठे झाले तो किल्ला कसा असेल, याची सर्वांनाच उत्स्तुकता होती. त्यांच्यासाठी हा एक वेगळा अनुभव होता. किल्ल्यावर सुरुवातीला महादरवाजा लागतो, तेथून किल्ल्यात प्रवेश केला. विद्यार्थ्यांना गडावर चढताना त्या किल्ल्याच्या तटबंदी, प्रवेशद्वार, आणि पुरातन गडदऱ्या यांचा जवळून अनुभव घेता आला. अंबरखाना, पाहायला मिळाल्या. 'शिवाई' देवीच्या मंदिरात देवीचे दर्शन घेतले. जिथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पदस्पर्श झाला तिथे थोडा वेळ बसून, डोळे बंद करून शिवरायांचे स्मरण केले नंतर शिवनेरी गडाच्या माथ्यावर पोहोचल्यावर विद्यार्थ्यांनी गडावरील देखावे, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, आणि त्या काळातील युद्धनीतीचा आढावा घेतला व नंतर भेट दिली शिवजन्म स्थळावर. तेथे शिवरायांना नमन केले. त्याठिकाणी शिवरायांची मूर्ती आणि डाव्या बाजूला पाळणा ठेवण्यात आलेला आहे. विद्यार्थी महाराजांसमोर नतमस्तक झाले. शिवनेरी भ्रमंती झाल्यावर सायंकाळी निसर्गाच्या सौदर्याचा सुंदर नजारा, जमिनीवरील स्वर्ग काय असतो, हे पाहण्यासाठी सह्याद्रीच्या कुशीत नाणेघाटात विद्यार्थी पोहचले आणि तेथील आशिया खंडातील एकमेव लेणी पाहायला मिळाली. सहलीचा समारोप झाला तो बाबासाहेब पुरंदरे यांच्या संकल्पनेतून पुण्यामध्ये साकारलेल्या शिवसृष्टी प्रकल्पाला भेट देऊन. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी केलेल्या पराक्रमाचा समग्र अन् चालताबोलता इतिहास जाणून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना येथे उपलब्ध झाली. या सहलीचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारशाची ओळख करणे तसेच त्यांना प्राचीन किल्ल्यांच्या संरक्षणात्मक आणि स्थापत्यकलेच्या बाबतीत माहिती देणे होते. रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, वर्षा पाटणकर, मनीषा वराडे, विनोद शिंदे, विनोद चव्हाण, अमोल देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# महात्मा बसवेश्र्वरांच्या पुतळ्याशेजारी होणारी सभा ऐतिहासिक - डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर

लातूर/ प्रतिनिधि: महात्मा बसवेश्र्वर हे बाजूने जावा यासाठी भाजपाच्या शिष्टमंडळाने



सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान आहेत.महामार्गाच्या कामात बसवेश्र्वरांचा पुतळा येत असताना त्यावर राजकारण झाले पण भाजप शिष्टमंडळाने विनंती केल्यानंतर पुतळा हलला नाही.त्यामुळे या पुतळ्याशेजारी होणारी ही सभा ऐतिहासिक आहे,असे प्रतिपादन भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

गुरुवारी सायंकाळी महात्मा बसवेश्र्वर चौकात झालेल्या सभेत डॉ.अर्चनाताई पाटील बोलत होत्या.या ऐतिहासिक सभेस माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते ड.व्यंकट बेद्रे,भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,माजी जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने,राष्ट्रवादीचे प्रशांत पाटील, डॉ.भातांब्रे,युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर,बाबू खंदाडे,बाबासाहेब कोरे,डी.एल.कांबळे,जितेंद्र बनसोडे आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. अर्चनाताई पाटील म्हणाल्या की,महात्मा बसवेश्र्वर यांचा पुतळा राष्ट्रीय महामार्गाच्या कामात येत होता.त्यावेळी त्यावरून राजकारण करण्यात आले.सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असणाऱ्या महात्मा बसवेश्र्वरांचा पुतळा हलवू नये.राष्ट्रीय महामार्ग त्याच्या केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली.ती विनंती मान्य झाली.यामुळे महात्मा बसवेश्र्वरांचा पुतळा हलला नाही.त्याच चौकात आज ही सभा होत आहे.त्यामुळे ही सभा ऐतिहासिक ठरणार आहे, असेही अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

ताईंनी सांगितले की, राज्यातील सर्व लाडक्या बहिणी महायुतीच्या सोबत आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा राज्यात महायुतीची सत्ता येणारच आहे.लातुरात विरोधक अपप्रचार करत आहेत. त्यांच्याकडे कर्तृत्व नाही. पदयात्रेत पूर्वजांचे फोटो घेऊन ते फिरत आहेत परंतु आता त्याचा फायदा होणार नसल्याचे ताई म्हणाल्या.

भाजपाने आपल्या वचननाम्यात लाडक्या बहिणींसाठी दिला जाणारा निधी १५०० रुपयावरून २१०० रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पुढील महिन्यापासून बहिणींच्या खात्यात अधिक रक्कम जमा होणार असल्याचेही डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

यावेळी सचिन दाने,अजित पाटील कव्हेकर,प्रशांत पाटील यांनीही विचार मांडत डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या सभेस शहर मतदारसंघातील भाजपा व महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते, नागरिक व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राशीभविष्य १५ नोव्हेंबर २०२४

मेष : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: दक्षिण

कौटुंबिक व मालमत्तेच्या विषयी असलेली समस्या दूर होईल. कोणचेही वाईट चिंतू नका. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होईल.परमेश्वरावरील विश्वास वाढेल.

वृषभ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम

व्यापारात अचानक यश मिळेल. प्रभावशाली व्यक्तिमत्व असल्या कारणाने आपला सल्ला घेतला जाईल. वाद विवाद टाळा. कौटुबिक वातावरण चांगले राहील.

मिथुन:शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम

आपला दृढ निश्चय असल्याने प्रत्येक कामात विजय मिळेल. आर्थिक प्रगती होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. नौकरीत आधिकारी लोकांची मदत मिळेल. मुलांचे जीवन चांगले राहील.

कर्क :शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पूर्व

नौकरांवर अति विश्वास दाखवू नका. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक वातावरण चिंतेचे राहील. खर्च कमी करण्याकडे लक्ष द्या.

सिंह : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व

आजचा दिवस चांगला जाणार आहे. आपल्या विचाराने आपल्या योजना कार्यान्वयीत करा. समाजात मान प्रतिष्ठा तसेच लोकप्रियता वाढणार आहे. खर्च कमी करा.

कन्या : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व

वाद विवाद, भांडणामुळे मानसिक ताण वाढणार आहे. व्यापारिक निर्णय घेण्यास उशीर करू नका. कुटुंबातील सदस्यांबाबत चिंता सतावणार आहे.

तुळ : शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा :पश्चिम

कामामध्ये आशावादी यश मिळण्याचे योग आहेत. आपल्या कामामुळे विरोधकांची तोंडे बंद होतील. जीवनसाथीशी वाद करू नका. अडकलेला पैसा मिळेल.

वृश्चिक:शुभरंग :लाल, शुभ दिशा:पश्चिम

आजचा दिवस व्यस्त जाईल. जादा परिश्रम झाल्यामुळे थकवा जाणवेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. जोखमीचे कामे करण्यापासून दूर रहा. मनासारखे कामे होण्याचे योग आहेत.

धनु: शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व

व्यवसायात महत्वपूर्ण बदल घडून येतील. वेळेचा पूर्ण उपयोग करून घ्या. कौटुंबिक समस्याकडे दुर्लक्ष करू नका. प्रवास करण्याचे टाळा.

मकर: शुभ रंग :हिरवा,शुभ दिशा:दक्षिण

सामाजिक प्रशंसा मिळाल्याने आनंदी रहाल. बुद्धी चातुर्यावर आजचा दिवस चांगला जाणार आहे. व्यापार चांगला चालेल. फुकटचा मोठेपणा दाखवू नका.

कुंभ : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा :दक्षिण

नवीन योजनेचा शुभारंभ होईल. भावनिक होऊन कोणतेही काम करू नका. आळस झटकून कामाला लागा. हितचिंतकाकडून योग्य सल्ला मिळेल.

मीन : शुभ रंग: केसरी,शुभ दिशा: पश्चिम

प्रतिष्ठित व्यक्तिंचा संप आल्यामुळे फायदा होईल. व्यवसायिक संतोष व प्रसन्नता मिळेल. जोखमीचे कामे सावधानीने करा. संतानच्या कार्यामुळे आनंदी रहाल.

# इतिहासात आजचा दिवस १५ नोव्हेंबर २०२४

अंतरराष्ट्रीय

१९४२ – जनरल मॉंटगोमेरीच्या सैन्याने अल एलामीनची दुसरी लढाई जिंकली. उत्तर आफ्रिकेतून जर्मन माघारीची सुरुवात.
१९६१ – कॉंगोचे पंतप्रधान पॅट्रीस लुमुंबा यांची सीआयएने हत्या केली.
२००३ – इस्तंबूलच्या सिनॅगॉंगवर हल्ल्यात २५ ज्यूंची हत्या.
२००४ – बुश यांचे परराष्ट्रमंत्री कॉलिन पॉवेल यांनी राजीनामा दिला.
२००८ – फ्लोरिडाचे अंतराळ यान प्रक्षेपण केंद्र कॅनेडी स्पेस सेंटरहून अंतराळ यान 'इंडेवर'चे सात अंतराळ वीरांचे एक पथकासह यशस्वीरित्या प्रक्षेपण करण्यात आले.

राष्ट्रीय

१९१५ – लाहोर कटात भाग घेणाऱ्या विष्णू गणेश पिंगळे यांना फाशी देण्यात आली.
१९४९ – महात्मा गांधी खून खटल्यातील प्रमुख आरोपी नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांना अंबाला तुरुंगात फाशी देण्यात आले.
२००६ – १९९३ मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणी विशेष टाडा न्यायालयाने टायगर मेमनच्या दत्तक बहिण मुबिना पाया भिवंडीवालासह अहमद शहा मुबारक ऊर्फ सलीम खान दुरानी, अझीझ अहेमद मोहम्मद अहेमद शेख व मोहम्मद रफीक मुसा बियारीवाला यांना दोषी ठरविले.
२००६ – डाइचे या बँकेने सुनील गावस्कर व सानिया मिर्झा क्रेडिट कार्ड सुरु केले.
२००७ – औरंगाबाद येथील मराठवाडा सांस्कृतिक मंडळावर महाराष्ट्र केसरी या कुस्ती स्पर्धेत सांगलीचा चंद्रहार पाटील 'महाराष्ट्र केसरी' पदकाचा मानकरी ठरला.
२००८ – जालना येथील कादरीया मशिदीत झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात आरोपी म्हणून राकेश धावडेला अटक करून पोलिसांनी न्यायालयात पुरवणी दोषारोपपत्र दाखल केले.

जन्म

१३१६ – जॉन पहिला, फ्रांसचा राजा.
१३९७ – पोप निकोलस पाचवा.
१४९८ – एलियोनोर, ऑस्ट्रियाची राणी.
१७०८ – विल्यम पिट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१७३८ – विल्यम फ्रेडरिक हर्शेल, 'युरेनस' या ग्रहाचा सर्वप्रथम वेध घेणारा.
१७८४ – जेरोम, वेस्टफालियाचा राजा.
१८५९ – क्रिस्टोफर हॉर्न्स्रुड, नॉर्वेचा पंतप्रधान.
१८७४ – जॉन हार्टली, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१८८७ – जॉर्जिया ओ'कीफ, अमेरिकन चित्रकार.
१८८९ – मनुएल दुसरा, पोर्तुगालचा राजा.
१८९१ – इर्विन रोमेल, जर्मन सेनापती.
१८९९ – इस्कंदर मिर्झा, पाकिस्तानचा पहिला राष्ट्राध्यक्ष.
१९०३ – स्ट्युई डेम्पस्टर, न्यू झीलँडचे क्रिकेट खेळाडू.
१९३१ – म्वाई किबाकी, केन्याचा तिसरा राष्ट्राध्यक्ष.
१९५४ – अलेक्सांदर क्वास्निव्स्की, पोलंडचा तिसरा राष्ट्राध्यक्ष.
१९६१ – झहीद अहमद, पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू.
१९६८ – पीटर मार्टिन, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९६९ – डेव्ह जोसेफ, वेस्ट ईंडीयन क्रिकेट खेळाडू.
१९७३ – शेन ओ'कॉनोर, न्यूझीलँडचे क्रिकेट खेळाडू.
१९८६ – सानिया मिर्झा, भारतीय टेनिस खेळाडू.

निधन

१०२८ – कॉन्स्टन्टाईन आठवा, बायझेन्टाईन स्म्राट.
१६३० – योहान्स केपलर, जर्मन अंतराळतज्ज्ञ व गणितज्ञ.
१७०६ – त्सांग्यांग ग्यात्सो, सहावे दलाई लामा.
१८५३ – मारिया दुसरी, पोर्तुगालची राणी.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894